N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** राजारामपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0349 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/07/2023 01:42

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

   **Time Period (कालावधी):**

   **Date From (दिनांक पासून):** 04/07/2023

   **Date To ( दिनांक पर्यंत):** 05/07/2023

   **Time From (वेळेपासून):** 11:21 बजे

   **Time To (वेळेपर्यंत):** 13:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/07/2023 **Time (वेळ):** 01:03 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/07/2023 01:03 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** विभागीय सहसंचालक,कोल्हापूर .विभाग,कोल्हापूर कार्यालय,राजाराम कलेज परिसरामध्ये,

**(c)In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अनिल सुभाष माने चेअरमन डायनो इन्स्टिटयुट ऑफ हटेल मनेजमेंट अँन्ड रिसर्च

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कासेगांव ,कासेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कासेगांव ,कासेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हेमंत नाना कठरे | | | 1. महालक्ष्मी रेसिडेन्सी, ,अंबाई डीफेन्स,राजारामपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रविण शिवाजी गुरव | | | 1. शंकर आनंद गुरव यांचे घरी,मुपो पिरवाडी,करवीर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | अनिल दिनकर जोंग | | | 1. राशिवडे बुद्रुक,राधानगरी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रूपये 30,000/ | 30,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

30,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक - 05/07/2023

मी अनिल सुभाष माने, वय - 48 वर्षे, व्यवसाय - सामाजीक कार्य, रा.कासेगांव ता.वाळवा जि.सांगली मो नं 9049944555 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 03/07/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना समक्ष भेटुन त्यांना माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगीतली की, माझे कासेगांव ता. वाळवा जि. सांगली येथे डायनो इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड रिसर्च सेंटर नावाची संस्था आहे सदर संस्थेत शासनाकडून बी एस्सी इन हॉटेल मॅनेजमेंट नविन महाविद्यालयाकरीता तसेच 1.बी.ए.योगशास्त्र 2.बी.एस्सी नविन महाविद्यालय याकरीता तात्पुरती परवानगी मिळालेली आहे. सदरची मंजूरी मिळालेनंतर विभागीय सहसंचालक कार्यालय, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर या कार्यालयाकडून आमचे कॉलेजची तपासणी करून सदर ठिकाणी विद्यार्थ्यांचे करीता सर्व सोई सुविधा आहेत अगर कसे याबाबत तपासणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र संबधीत विद्यापीठांना दिले जाणार आहे. व त्यानंतर विद्यापीठाकडून कॉलेजला कायमस्वरूपात मान्यता मिळणार आहे. सदरची तपासणी विभागीय सह संचालक,(उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांनी नियुक्त केलेले राजाराम कॉलेज, कोल्हापूर यांचेकडील प्राध्यापक पठारे यांनी केली होती. सदर तपासणी नंतरचे प्रमाणपत्र देणेसाठी विभागीय सह संचालक,(उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग कोल्हापूर, राजाराम कॉलेज जवळ कोल्हापूर या कार्यालयातील कठरे साहेबांचे पि.ए. गुरव यांनी कठरे साहेबांना प्रत्येक फाईलचे 50,000/- रूपये द्यायला पाहीजेत व ते पैसे क्लार्क जोंग यांचेकडे द्या त्या शिवाय प्रमाणपत्र मिळणार नाही असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केली. तरी त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन मी स्वतः हस्तलिखीत तक्रारी अर्ज दिला व आज रोजी मी त्यांना राजाराम कॉजेल जवळील त्यांचे कार्यालयात भेटायला जाणार आहे असे सांगीतले होते.

त्यानंतर माझे तक्रारीवरती कारवाई करणेकामी नाळे साहेबांनी लागलीच सहायक कामगार आयुक्त कार्यालयातुन दोन पंचाना बोलावुन घेतले त्यांची व माझी आपआपसात ओळख करून दिली व माझी तक्रार त्यांना सांगितली. नाळे साहेबांनी पुढील कारवाई अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथील कार्यालयातुन करण्याचे आहे सांगीतले. नाळे साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचाना देवुन त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयातील कठरे साहेब त्यांचे पिए गुरव व क्लार्क जौंग यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने मला तसेच पंच नं. 1 गोरखनाथ थोरवत यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर नाळे साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 असे अँन्टी करप्शन ऑफीस मधुन दुपारी 2.42 वाजता माझेकडील बीएमडब्ल्यू कार क्रमांक एम.एच.04- एफआर 4320 मधुन राजाराम कॉलेज, कोल्हापूर जवळ असले सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग,कोल्हापूर येथील कार्यालयात पाठविले. आम्ही सदर कार्यालयात गेलो तेथे मला पी.ए.गुरव भेटले त्यांचेत व माझेत माझे कॉलेजचे कामाचे अनुषंगाने तसेच सदर कामासाठी लागणारा स्टॅम्प यांचे अनुषंगाने बोलणे झाले. साहेब कोठे आहेत असे विचारले असता त्यांनी साहेब जेवायला गेले असल्याचे सांगीतले साहेबांना भेटायची गरज आहे असे त्यांना विचारले असता भेटुया की बसा असे गुरव म्हणाले व ते त्यांचे कामात ऑफीसमध्ये कोठेतरी गेले. मी बराच वेळ कठरे साहेब

यांची मी वाट पाहीले परंतु ते आले नाहीत त्यावेळी मी बसलेले ठिकाणी क्लार्क जोंग आले त्यांनीही मला माझे कामाविषयी विचारून स्टॅम्प आणला आहे का विचारले त्यावेळी मी त्यांना साहेबांना बोलुन लगेच हे करूया असे म्हणालो त्यावेळी क्लार्क जोंग यांनी सर बाहेर गेले आहेत सांगीतले. क्लार्क जोंग साहेबाना फोन लावतो असे म्हणुन तेथुन निघुन गेले. त्यावेळी मी थाबलेल्या ठिकाणी पी.ए.गुरव आले त्यांनी मला परत नोट्री केली आहे का असे विचारले त्यावेळी मी सहावाजेपर्यंत मिळले असे सांगीतले. त्यावेळी त्यांनी साडेसहा वाजेपर्यंत नोट्री घेवुन या असे सांगीतले. त्यानंतर आम्ही त्यांची वाट पाहुन अँन्टी करप्शन ऑफीसमध्ये परत आलो. मला व पंच 1 थोरवत यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन खात्री केली. त्यानंतर मला नोट्री घेवुन साडेसहा वाजेपर्यंत या असे गुरव म्हणालेने तसेच माझी कठरे साहेबांसोबत भेट झाली नसल्याने त्यांची भेट घेणेसाठी जाणेचे सर्वामते ठरलेने मला वरील प्रमाणे नाळे साहेबांनी सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझे गळयात अडकवला त्यानंतर मी व पंच पुन्हा माझे वरील कार मधुन सायकांळी 06.56 वाजता वरील कार्यालयाकडे गेलो. तेथे माझी पी. ए.गुरव यांची परत भेट झाली ते मला तुम्हाला मगापासुन जोंग सर फोन लावत आहेत तुम्ही फोन उचलला नाही साहेब आलेपासुन तुमची वाट पाहत होते तुम्ही फोन उचलला नाही म्हणुन ते निघुन गेले असे मला म्हणाले. त्यावेळी मी त्यांना नोटरी करायला गेलो होतो असे सांगीतले. त्यावेळी पी.ए.गुरव यांनी मला स्टॅम्प पेपर असलेशिवाय काहीच करू शकत नाही आता उदया सकाळी स्टॅम्प पेपर घेवुन या त्या शिवाय काही करू शकत नाही असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना सकाळी आकरा साडेआकरा पर्यंत येतो असे सांगुन निघुन आलो तेथे नाळे साहेबांनी मला व पंच 1 थोरवत यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन खात्री केली. त्यानंतर नाळे साहेबांनी आम्हा सर्वांना दि.04/07/2023 रोजी सकाळी 10.30 वाजता अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे हजर राहणेबाबत कळवुन त्यानंतर पुढील कारवाई आयोजीत करण्याचे ठरले. सदर दिवशीचा सविस्तर पंचनामा नाळे साहेब, पंच यांचेसमक्ष करणेत आला आहे.

दिनांक 04/07/2023 रोजी मी सकाळी 10.30 वाजता अँन्टी करप्शन कार्यालयात पोहचलो त्यावेळी नाळे साहेबांसमोर पंच, स्टाफ असे हजर होते. त्यावेळी नाळे साहेबांनी विभागीय सह संचालक कठरे साहेब त्यांचे पिए गुरव व क्लार्क जोंग यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने मला तसेच पंच नं. 1 गोरखनाथ थोरवत यांना पुन्हा योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर नाळे साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 असे अँन्टी करप्शन ऑफीस मधुन सकाळी 11.21 वाजता माझे बीएमडब्ल्यु कार क्रमांक एम.एच.04- एफआर 4320 मधुन राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे असले सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग,कोल्हापूर येथे पाठविले. सदर कार्यालयात पाठविले आम्ही कार्यालयात गेलो त्यावेळी मी पी.ए.गुरव यांना भेटलो तेव्हा आमचेत कॉलजचे प्रमाणपत्र व त्यासाठी आवश्यक असणारे प्रतिज्ञापत्राचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी गुरव यांनी प्रमाणपत्र देणेसाठी साहेबांना दोन्ही कामाचे प्रत्येकी पन्नास हजार रूपये द्यावे लागतील असे म्हणुन परंतु तुमच्याकडे पन्नास मागतोय असे म्हणुन पन्नास हजार रूपये लाचेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना थोडे अँडजस्ट करा असे म्हणालो. त्यावेळी गुरव यांनी तुमची तयारी किती आहे सांगा असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना साहेबांना विचारून तर घ्या असे म्हणालो त्यावेळी गुरव कठरे साहेबांना भेटायला त्यांचे केबीन मध्ये गेले काहीवेळाने गुरव केबीन मधुन बाहेर आले. त्यावेळी क्लार्क जोंग ही गुरव साहेबांचे जवळ आले होते त्यावेळी मी गुरव यांना काय म्हणाले कठरे साहेब असे विचारल. त्यावेळी गुरव यांनी पचंवीस पंचवीस करा असे म्हणताहेत असे म्हणाले त्यावेळी मी दोन्ही कामाचे पंधरा - पंधरा हजार असे तिस हजार दोन्ही मिळुन देतो, विषय संपवा मला पत्र द्या कुणाकडे पैसे देवु असे म्हणालो असता गुरव यांनी जोंग यांचेकडे हात करून साहेबांकडे दया म्हणजे जोंग साहेबांकडे देणेस सांगीतले. त्यावेळी मी कोठे असे म्हणुन विचारले असता क्लार्क जोंग यांनी मी बसतोय तिथेच की असे म्हणाले त्यावेळी मी ओके असे म्हणुन मी व पंच नं. 1 असे अँन्टी करप्शन ऑफीसमध्ये परत आलो. तेथे त्यांनी मला व पंच 1 थोरवत यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुन खात्री केली.

त्यानंतर नाळे साहेबांनी कठरे साहेब हे लाच मागणी करतात अगर कसे याबाबत त्यांची पडताळणी करण्याचे आहे असे सांगीतले. म्हणुन पुन्हा नाळे साहेबांनी आम्हाला सुचना देवुन माझे गळयात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर अडकवुन चालु करून मला व पंच थोरवत असे अँन्टी करप्शन ऑफीस मधुन माझे बीएमडब्ल्यु कार क्रमांक एम.एच. 04- एफआर 4320 मधुन राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे जवळ असले सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग,कोल्हापूर येथे दुपारी 02.40 वाजता पाठविले आम्ही कार्यालयात गेलो. त्यावेळी गुरव व कठरे साहेब कार्यालयात नव्हते म्हणुन मी गुरव यांचा मोबाईल नंबर 8424060410 यावर स्पिकर फोन करून फोन लावला त्यावेळी त्यांनी गुरव यांनी तयार करून दिले आहे क्लार्क जोंग यांना भेटा तसेच ते व कठरे साहेब बाहेर व्हिजीटला गेलो असे म्हणाले मी क्लार्क जोंग यांना भेटलो त्यावेळी मी त्यांना गुरव यांना फोन केला होता त्यांनी तुम्हाला

भेटायला सांगितले होते असे म्हणालो त्यावेळी क्लार्क जोंग यांनी मला एक काम करा फाईल देतो त्यात ठेवुन द्या असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना पैसे एकजण घेवुन येत आहेत असे म्हणालो त्यावेळी ते ठिक आहे असे म्हणाले. पी. ए.गुरव यांनी क्लार्क जोंग यांचेकडे काम तयार आहे असे सागिंतले होते परंतु मी जोंग यांना पैसे दिले नसल्याने त्यांनी मला प्रमाणपत्रे दिली नाहीत. तसेच कठरे साहेब व गुरव हे बाहेर व्हिजीटला गेले असल्याने मी व पंच नं. 1 असे अँन्टी करप्शन ऑफीसमध्ये परत आलो. तेथे नाळे साहेबांनी मला व पंच 1 थोरवत यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली. त्यानंतर नाळे साहेबांनी मला तसेच पंच व स्टाफ ला दि.05/07/2023 रोजी सकाळी 10.30 वाजता गव्हरमेंन्ट पॉलीटेक्नीक मुलांचे वसतीगृह कोल्हापूर विद्यापीठ रोड येथे हजर राहणेबाबत कळवुन त्यांनतर पुढील कारवाई आयोजीत करण्याचे ठरले. सदर दिवशीचा सविस्तर पंचनामा नाळे साहेब, पंच यांचेसमक्ष करणेत आला आहे.

दिनांक 05/07/2023 रोजी मी सकाळी 10.30 वाजता गव्हरमेंन्ट पॉलिटेक्नीक मुलांचे वसतीगृह कोल्हापूर विद्यापीठ रोड पोहचलो त्यावेळी तेथे नाळे साहेब पंच, स्टाफ असे हजर होते. त्यावेळी नाळे साहेबांनी मला काळे रंगाचे बलेनो एम.एच.09.ए.जी.8167 या कारमध्ये बोलावुन घेवुन सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयातील कठरे साहेब यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने मला तसेच पंच नं. 1 गोरखनाथ थोरवत यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर नाळे साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 यांना त्यांचे स्टाफकडील मोटर सायकलवरून दुपारी 12.08 वाजता कठरे साहेबांची भेट घेणेसाठी राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे जवळ असलेल्या सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग,कोल्हापूर या कार्यालयात पाठविले मी व पंच असे कठरे साहेबांचे कार्यालयात गेलो त्यावेळी कठरे साहेब कोठेतरी बाहेर निघाले होते ते मला कार्यालयाचे बाहेरच ,भेटले मी त्यांना माझी ओळख सांगुन कॉलेज कामासंदर्भात बोललो तसेच गुरव साहेबांनी दोन्ही कामाचे पन्नास हजार रूपये मागीतले आहेत असे बोललो त्यावळी कठरे साहेबांनी दोन कॉलेज आहेत का असे विचारले त्यावेळी मी हो असे म्हणुन तीस हजार रूपयांचा विषय झाला होता इथुन पुढील फिर्याद ही मुळ फिर्यादीप्रमाणे आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Sachin Maruti Desai
**Rank (पद):** PC (Police Constable) **No.(क्र.):** PSMH27916
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)
ठाणे अंमलदार
राजारामपुरी पोलीस ठाणे
कोल्हापूर
**Name** (नाव): ANIL HARIBHAU TAN
**Rank**(पद): (Inspector)
**No.**(सं.): PCMH82181